# मौल्यवान आठवणी - भाग २

पू. बाबूजींचे पत्र बराच वेळ हातांत घेउन बसले. अजूनही विश्वास बसत नव्हता. हाताला चिमटा घेतला आणि खात्री करुन घेतली. परत एकदां मजकूर वाचला. ह्यांना फोन करायची खूप इच्छा झाली. घड्याळाकडे एक नजर टाकली. सकाळचे अकराच वाजले होते. हे नक्कीच ऑपरेटींग रुममध्ये असणार. मग ह्यांना आणखी एखाद्या तासाने फोन करायचे ठरविले. किंवा एक ऑपरेशन संपले आणि दुसरे सुरु करायच्या आधी नेहमीप्रमाणे ह्यांचा फोन येईलच. ह्यांचे सगळे मित्र नाहीतरी ह्यांची नेहमीच उडवीत असतात. ह्यांचे नांव, तुलसीदास ठेवले आहे म्हणे. मी ह्यांना म्हटले, सगळेजण करत असतील ना त्यांच्या त्यांच्या  घरी फोन?. हे म्हणाले, अग तो ए. सी. आहे ना तो तर एकदांही घरी फोन करीत नाही. घरी गेल्यावर पहायचेच आहे की तिचे तोंड !. ते ऐकून मी हवालदिल होत असे. ए. सी. तसा गुंटुरचा, ह्यांना एक वर्ष ज्युनीयर. त्याचे लग्न त्याची बायको, लक्ष्मी, त्याची भाच्ची, पाळण्यांत असतानाच जमले होते म्हणे. बहीणीच्या नवऱ्यानेच, म्हणजे, लक्ष्मीच्या वडिलांनीच त्याच्या शिक्षणाचा, अमेरीकेत येण्याचा खर्च केलेला, वरुन भरपूर जमीन, तांदूळ आणि टोबॅकोची लागवड असलेली जमीन, आणि लक्ष्मीला इकडे पाठविण्याचा पूर्ण खर्च दिला. लक्ष्मीला दोन लहान बहिणी. भाऊ नाही. पुढेमागे सगळं तिन्ही मुलींनाच जाणार असा त्या निरागस आईवडिलांनी विचार केलेला. आणि हा असं म्हणतोय? मला तर रागच आला. लक्ष्मी सगळ्यांत मोठी मुलगी. तिच्या आईवडिलांनी सांगितले की तिचे कोणीतरी कन्यादान करायला पाहिजे. भारतांतून आल्यावर ती आमच्याच घरी आली. लग्न होईपर्यंत कसे जाणार ए. सी कडे? ती त्याला मामय्या म्हणे. एक दिवस तिने हळूच माझ्यासमोर विषय काढला. तुम्ही कन्यादान कराल कां विचारले. ती अठरा वर्षाची आणि मी सतरा वर्षाची. पण तो विचार बाजूला ठेवला. आणि मी पू. राम पटवर्धनांना फोन लावला. त्या काळांत ते सगळ्यांची लग्नं, मुंजी लावीत. त्यांची एक खैसीयत म्हणजे मी जेव्हां जेव्हां फोन करे, ते पटकन् म्हणत, काय सुरेखा, कशी आहेस तू? खरं म्हणजे मी ह्यापूर्वी त्यांना दोनतीनदांच फोन केला होता. घरी सत्यनारायणाची पूजा करण्यानिमित्ताने. मी म्हटलं, काका कसं ओळखलत तुम्ही मला? ते म्हणत, अग तू दिसायला सुंदर वरुन गोड आवाज, कसा मी तुला विसरेन? मी आपली लाजून चुरर्. त्यानंतर मी त्यांना कधीच तो प्रश्न केला नाही. नाही म्हणायला आम्ही बॅनरला आलो तर १९८० साली आमच्या घराची वास्तुशांती करण्यासाठी आम्ही त्यांनाच पाचारण केले. न्यूयॉर्कहून ते व्हाया पिट्सबर्ग येणार होते. ते पिट्सबर्गपर्यंत आले आणि तेथेच अडकले. हवा वादळी होती म्हणून हंटींग्टनची फ्लाईट कॅन्सल झाली. हे त्यांना हंटींग्टनहून कारने घरी घेऊन येणार होते. दीड दोन तासांचा प्रवास. पण त्यांचा फोन आला पिटस्बर्गला अडकल्याबद्दल. मग काय ? काकांनी पूजा फोनवरच सांगितली. वास्तविक आमच्या न्यूयॉर्कच्या घराची वास्तुशांती १९७२ साली काकांनीच केली होती. १९७२ नंतर काकांची भेट १९८५ च्या टोरांटो कन्व्हेनशनमध्ये झाली.

दुरूनच काकांनी मला ओळखले आणि हांक मारली. काका इतक्या वर्षानंतर पण तुम्ही मला ओळखले? पुढचे ते कांही बोलायच्या आंतच मी म्हटले, "काका पाया पडते. आशीर्वाद द्या". काका म्हणाले तू अजून आपली संस्कृती जपून ठेवलीयस. त्यांनी माझ्या डोक्यावर हांत ठेवला आणि तोंडभरुन इच्छीत आशीर्वाद दिला. "अखंड सौभाग्यवती भव: तुझ्या सर्व मनोकामना पुऱ्या होवोत." ते ऐकून मला स्वर्ग दोन बोटेच उरला ह्याची प्रचीती आली.

हं, तर मी काय म्हणत होते,

पटवर्धनकाकांनीच लक्ष्मीचे लग्न लावले. आणि मी ए. सी.ची सासू झाले. काका म्हणाले, चला, आईवडिलांच्या पाया पडा. लक्ष्मीने पटकन् आम्हां दोघांना वाकून नमस्कार केला. मी तिला अखंड सौभाग्यवती भव असा मनापासून आशीर्वाद दिला. (पण माझा आशीर्वाद खोटा ठरला. लग्नाच्या ४५ वर्षानंतर ए. सी. ला  एक अवदसा मिळाली आणि त्याने लक्ष्मीला घटस्फोटाचे पेपर्स पाठविले. लक्ष्मीने आनंदाने घटस्फोट दिला. एकदांची तिची सुटका झाली ह्या बंधनातून असे तिचे म्हणणे. तरी पण घटस्फोटाची फॉर्मॅलिटी पूर्ण होईपर्यंत २-३ वर्षे लाागलीच. ह्यांत फक्त वकिलांचाच फायदा होतो). आणि मी तिला आई जशी मिठी मारते तशी मिठी मारली. ए. सी. आणि लक्ष्मी दोघांनाही गहिवरुन आले. पण ए. सी. मला वांकून नमस्कार करायला मागेपुढे करु लागला. मी त्याच्यापेक्षां दहा वर्षाने तरी लहान आहे म्हणून. मी म्हटले, ते कांही नाही, मी तुझी सासू आहे आतां. नमस्कार करायलाच पाहिजे. आणि काय? त्याने खरोखरच वांकून माझ्या पायांला हात लावला. आणि आलेल्या सगळ्या मंडळींत हंशा उमटला.

माफ करा हं जरा विषयापासून दूर भरकावल्याबद्दल. तर काय म्हणत होते मी?, त्यादिवशी ह्यांचा फोनच आला नाही. रात्री आठला घरी आल्यावर हे म्हणाले, सॉरी, फोन करायला वेळच मिळाला नाही. एकानंतर एक अशी सहा ऑपरेशन्स करावी लागली मला. जेवायला पण वेळ मिळाला नाही. स्वयंपाक झाला असेल तर, सगळं गरम करतेस कां?. मला जाम भूक लागली आहे. नेहमीप्रमाणे ह्यांच्या लाडक्या लीनताची पण विचारपूस केली नाही. त्यावरुन माझ्या लक्षांत आले, स्वारीला खरंच खूप भूक लागलीय. मी स्वयंपाकघराकडे वळत पुटपुटले, जळ्ळी मेली तुमची रेसीडेन्सी ! साधं दुपारच्या जेवणासाठी पण वेळ देत नाहीत. हे काय ३६ तास काम करायचे सतत आणि बारा तासांसाठी घरी यायचे. सायंकाळी पांचला यायच्याऐवजी रात्री आठला उगवायचे आणि दुसरे दिवशी परत पहाटे साडेपांचलाच निघायचे घरुन. कां तर म्हणे राउंडस् मारायचे. आठच्या पेशंटला तपासायचे आणि सर्जरीसाठी लागणारे सर्व पेपर्स पहायचे. गुलामासारखे पिळवटून कामं करुन घेतांत बेटे. एकीकडे रागाने माझा तिळपापड झाला तर दुसरीकडे अरेरे! दिवसभर जेवले पण नाहीत. मी मेली, मस्त जेवण करुन दिवसभर खेळत बसले लीनताबरोबर.

ह्या सगळ्या गोंधळांत बाबूजींचे पत्रच विसरुन गेले मी. जेवण गरम करतांना ह्यांनी नेहेमीप्रमाणे प्रश्न विचारला, आज भारतांतून काही पत्रं आली कां ? मी हो म्हटले. नेहमीप्रमाणे तुझ्या आईचेच पत्र आले असेल म्हणा. स्वतःच्या प्रश्नाचे स्वत:च उत्तर देऊन मोकळे. (ती खोड अजूनही गेली नाहीय. सगळे सर्जन असेच असतात हे सकायट्रीमध्ये रेसीडेन्सी करणार्या, डॉ. सराफचे मत. मी मनांत म्हणे, अजून सकायट्रीची रेसाडेन्सी पण पूर्ण झाली नाही. हा लगेच शेरे मारायला तय्यार. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे ह्यालाच म्हणतात कदाचित्). आरामांत जेवण होऊ दे. मग सांगेन. नाही तर जेवण राहिल एकीकडे आणि पत्र वाचून ह्यांचा आनंद गगनांत मावणार नाही. आणि जेवणाकडे दुर्लक्ष करतील. पत्र कोठे पळून जाणार आहे? नंतर सांगेन. जेवण झाले आणि लीनताचा आवाज ऐकू आला. अरेरे ! माझ्या सोनुलीला मी विसरलोच की असे म्हणत बेडरुमकडे पळाले. लीनताशी खेळत, जवळ पोटाशी घेऊन स्वारी मस्त घोरायला लागली. डॉ. स्पॉकच्या म्हणण्याप्रमाणे बाळाला इतकं जवळ घेऊन झोपू नये. बाळ आपल्याच वजनाखाली..... नाही नाही ते अभद्र विचार मनांत येऊन गेले. आणि मी पटकन् लीनताला ह्यांच्या मिठीतून सोडविले. तुम्ही पण ना अगदी लहान मुलासारखे करता कधी कधी. आणखी दोन वर्षांत तुम्ही जनरल सर्जन व्हाल. हे मी कोणाला सांगितले तर पटणार पण नाही. मला आठवते, लीनताच्या वेळी टेस्ट पॉजीटीव्ह आली. लीनताच्या येण्याची पहिली चाहुल ती. ह्यांनी डिक्लेअर केले. पहिली मुलगी पाहिजे बरं कां? ए, तुझ्या आईदादांना पण कळव हं. हे त्यांचे पहिलच नातवंड. तू त्यांना पत्र लिही. मी आपली लाजून चुरर्. ईश्य ! मी नाही लिहीणार. तुम्हीच लिहा. मला लाज वाटते. त्यांत एवढे लाजण्यासारखे काय आहे? बरं. मी लिहीतो. खुष आतां ? तर स्वारीने कबूल केले, ते लिहीतील माझ्या आईदादांना. मी एक दीर्घ श्वास सोडला. एकदोन दिवसांनी ह्यांनी आईदादांना लिहीलेले पत्र आणून दिले. अेअर लेटरच्यामागे तुझ्यासाठी जागा ठेवलीय. तू पत्र पूर्ण कर. मग मी पोस्ट करतो. मी ह्यांनी काय लिहीलयं हे वाचायला सुरुवात केली. "पू. मामामामी साष्टांग नमस्कार. आम्हांला आतां घरांत लवकरच पाळणा आणावा लागणार". स्वारी मला म्हणत होती, त्यांत काय लाजायचे? पुढे लिहीले होते, मी बाप व्हायच्या लायकीचा आहे ना? घ्या !!. सर्जनची लायकी नसेल तर आणखी कोणाची लायकी असणार?

हे मस्त घोरत होते. त्यांना उठवायची इच्छाच झाली नाही. परत पत्राबद्दल सांगायचे राहूनच गेले. अशी कशी मी इतकी खुळी? उद्या नक्की सांगेन असे म्हणून मी लीनताचे डायपर बदलले. तिला मस्त गुलाबी रंगाचा नाईटड्रेस घातला. आणि थोड्या वेळाने लीनताला झोपविले आणि मी पण मनांत ठरविले, उद्या ह्यांना नक्की बाबूजींच्या पत्राबद्दल सांगेन असा विचार करीत असतांनाच निद्रादेवीने मला कधी तिच्या कवेत घेतले ते समजलेच नाही.

(क्रमशः)

**- सुरेखा मद्दिवार**